# उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय

नविन प्रशासकीय इमारत (वनभवन), झिरो माईल जवळ, सिव्हील लाईन, नागपूर – ०१

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६५६२३/२५६५३६१ ईमेल आयडी - dcf_nagdiv@yahoo.co.in


क्रमांक- कक्ष-९/दक्षता/प्र.क्र.५७/२०२४-२०२५/ 903 दिनांक- 13/०६/२०२५

## महिला मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करणेबाबत

## जाहिरात

मुख्य वनसंरक्षक, नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे अधिनस्त क्षेत्र तथा नागपूर जिल्ह्याकरिता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम- १९७२ मधील कलम-४ (१) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत **महिला मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती** करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र महिला उमेरदवाराकडुन केवळ नागपूर वनविभागाचे **Email ID- dycfnagpur@mahaforest.gov.in** वर अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जासह खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी:

१. मानद वन्यजीव रक्षकची नियुक्ती साठी अर्ज.

२. आधार कार्ड.

३. वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ. बाबत केलेल्या कामाचा तपशील.

४. वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचे काम केल्याचे प्रमाणपत्र.

५. वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचे काम केल्याचे वृत्तपत्र कात्रण.

६. वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचे काम केल्याचे कलर फोटो.

७. वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचे काम केल्याचे अनुभव पत्र व प्रशंसापत्र.

वरील जाहिरातीचे अनुषंगाने याद्वारा सुचीत करण्यांत येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणाऱ्या तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणाऱ्या महिला उमेदवारांनी समोर यावे याकरिता वन्यजीव संरक्षणार्थ महिला मानद वन्यजीव रक्षक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी महिला मानद वन्यजीव रक्षक या पदाकरीता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबंधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यांत येत आहे. मानद वन्यजीव रक्षक हे पद एक स्वयंसेवकीय (volunteer) पद असल्याने त्यासाठी कोणतेही विशिष्ट वेतन (salary) दिले जाणार नाही.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग, नागपूर या कार्यालयाचे **Email ID- dycfnagpur@mahaforest.gov.in** आयडीवर अर्ज स्विकारणे कालावधी | दि. २३ जुन २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा.पर्यंत. |
| २. | उपवनसंरक्षक यांचेमार्फत प्राप्त अर्जाची छाननी करणे. | दि. २३ जुन २०२५ ते २७ जुन २०२५ |

**(डॉ. भारत सिंह हाडा)**
**उपवनसंरक्षक**
**नागपूर वनविभाग, नागपूर**

**टिप- 1. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in या संकेत स्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्यांची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.**

**2. उमेदवाराने प्रस्ताव सादर करताना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबत पुरावा जोडणे बंधनकारक आहे.**

प्रस्तुत जाहिरात ही संक्षिप्त जाहिरात असुन अर्ज स्विकारण्याची पद्धत, अर्हता, निवडीचा प्रक्रिया याबाबतचा सविस्तर तपशील **https://mahaforest.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. उमेदवारांना कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नसुन वरील संकेतस्थळावर आवश्यक माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी

## अटी व शर्ती

१. फक्त महिला उमदेवारांनी अर्ज करावे.

२. उमेदवारास वन्यजीव संवर्धनाची खरी काळजी असणे आवश्यक आहे.

३. निसर्गाच्या आणि वन्यजीव संवर्धनाच्या हिताला हानि पोहोचवणाऱ्या कोणत्याही अपराधी कृत्यात सहभागी नसलेला व्यक्ती.

४. वन्यजीवांच्या व्यावसायिक शोषणात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा विचार केला जाणार नाही.

५. वन व वन्यजीव विभागाचे यंत्रणेला मदत करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

६. स्थानिक समुदायाशी संवाद साधुन त्यांना वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचा संदेश पोहोचवण्यात सक्षम असणारी व्यक्ती.

**(डॉ. भारत सिंह हाडा)**
**उपवनसंरक्षक**
**नागपूर वनविभाग, नागपूर**